# व्यवस्था म्हणजे काय?

चन्द्रशेखर पुरन्दरे

**प्रस्तावना व लेखाची मांडणी**

व्यवस्था हा शब्द अनेकदा वापरला जातो. सद्यस्थिती या अर्थी व्यवस्थेवर बहुधा टीका होते. अमुक त्रुटी नाहीशा केल्या की एक श्रेयस्कर व्यवस्था येईल असे म्हटले जाते. सद्यस्थितीतील त्रुटी व श्रेयस्कर व्यवस्थेचे रूप प्रत्येकजण त्याच्या किंवा तिच्या चष्म्यातून पहातो किंवा पहाते.

उदाहरणार्थ, डाव्या विचारसरणीनुसार भांडवलशाही, जागतिकीकरण, त्याचे बाहुले बनलेले राष्ट्र-राज्य ही सद्यस्थिती आहे. त्यांच्या अति-डाव्या परिघानुसार प्रसंगी हिंसेशिवाय नवी समताधिष्ठित व्यवस्था येणार नाही. हिंदू धार्मिक माणसाच्या मते वर्तमान कलियुगात धर्माचा ऱ्हास होत आहे ही सद्यस्थिती. (भगवंताच्या शब्दांत 'ग्लानी' आली आहे!) धर्माचे पुनरुज्जीवन झाल्यास नवी व्यवस्था येईल. स्त्रीवादाच्या मते पुरुष-प्रधानता ही सद्यस्थिती आहे. बृहत्समाजकारण ही पुरुषांनी पुरुषांसाठी चालवलेली व्यवस्था आहे म्हणून तिचा विलय आवश्यक. व्यवस्था सामाजिकच असतात असे नाही. उदा. शरीर, शास्त्रीय संगीत, भाषा याही व्यवस्था आहेत. लेख सामाजिक व्यवस्थांवर आहे.

या श्रेय व्यवस्थांत प्राधान्यक्रम ठरवता येतो का? म्हणजे, आधी ही व्यवस्था आली, ह्या त्रुटी दुरुस्त केल्या तर उरलेल्या आपोआप निस्तरल्या जातील - असे म्हणणे कठीण आहे. त्या गुणात्मक समान पातळीवर नाहीत. तसेच एकाहून अधिक सामाजिक व्यवस्था एकाच वेळी माणसाच्या जगण्यावर परिणाम करतात. त्या अनेकदा परस्पर-विरोधीही असतात, उदा. पोथीनिष्ठ धर्म (हिंदूच नव्हे तर सर्व धर्म) स्त्री-स्वातंत्र्य नाकारतो. मग एखादी सर्वसमावेशक व्यवस्था असू शकते का, हे पहाणे हा लेखाचा उद्देश आहे.

सद्यस्थितीत जगाच्या मोठ्या लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक व आरोग्य, शिक्षण, सुरक्षा वगैरे दुय्यम गरजा भागत नाहीत. ही वस्तुस्थिती समाधानकारक नाही. म्हणून पर्यायाचा विचार.

यात व्यवस्थेमागचे रूपक, तिची न्यायाशी, इतिहासाशी आणि सत्तेशी असणारी नाती आधी पहिली आहेत. नंतर सद्यस्थितीचा त्रोटक आर्थिक व राजकीय आढावा आहे. शेवटी पर्यायी व्यवस्थेवरील आजवरचे चिंतन व निरीक्षणे आहेत.

**रूपक**

व्यवस्थेची संकल्पना जे रूपक गृहीत धरते, ते सद्यस्थिती व श्रेयस्कर व्यवस्था दोन्ही ठरवते. गेली काही शतके पाश्चात्त्य (व त्याच्या प्रभावाखाली जागतिक) विचारात हे रूपक इमारतीचे



राहिलेले आहे. व्यवस्था ही एक इमारत असते व तिची प्रत्येक वीट हा व्यवस्थेचा एकक आहे. विज्ञानाचा रोख प्रत्येक विटेचा अधिकाधिक खोलात अभ्यास करणे हा राहिला - शरीर ही व्यवस्था, त्याचे अवयव, पेशी, जनुके. किंवा पदार्थविज्ञानात अणु, परमाणु इत्यादी.

मात्र, पर्यावरण ही एक व्यवस्था मानली तर सगळी सृष्टी म्हणजे तिच्यातील सजीव, निर्जीव घटक; मानवनिर्मित जग व त्यांचे लागेबांधे या सगळ्याचा विचार करायला लागतो.

'लागेबांधे' आले की रूपक बदलते. इमारतीच्या स्थिर विटांऐवजी कंपनक्षम जाळे हे रूपक जास्त योग्य ठरते. त्याचे धागे परस्परांशी निगडित असतात व एकात होणारी स्पंदने सगळ्या जाळ्यापर्यंत पोचतात. विटांच्या अभ्यासाबरोबर या परस्पर-संबंधांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. किंबहुना पर्यायी व्यवस्थेसाठी तो अभ्यास विटांच्या अभ्यासापेक्षा जास्त महत्त्वाचा. ही जाणीव प्राचीन चिंतनात होती. पण ती सार्वत्रिक होण्यापेक्षा आध्यात्मिक झाल्याने फार थोड्या लोकांपुरती मर्यादित राहिली असावी. विज्ञानाच्या प्रगतीत हे परस्परावलंबी रूपक मागेच पडले नाही तर त्याच्याकडे हेतु-पुरस्सर दुर्लक्षही झाले.

वैज्ञानिक विचारात कशाचा समावेश व्हावा आणि कशाचा होऊ नये हे खगोलशास्त्रज्ञ गॅलिलिओ (१६-१७वे शतक) स्पष्ट करतो. आकार, क्रमांक व गती या गोष्टी मोजता येण्यासारख्या आहेत. तेव्हा वैज्ञानिक विचारात फक्त त्यांचा समावेश व्हावा. रंग, गंध, चव, आवाज हे गुणधर्म वैयक्तिक आवडी-निवडीवर ठरतात, त्यामुळे त्यांना वैज्ञानिक विचारात स्थान नाही. नेमके संशोधन व्हावे, बाकी फाफटपसारा नको या दृष्टीने हा विचार योग्य वाटतो पण जगाकडे पहाण्याचा दृष्टिकोन त्यामुळे मर्यादित होतो. उदा. मोजता येणाऱ्या आर्थिक वाढीवर सरकारने लक्ष केंद्रित केल्यास सामाजिक व्याधीत भर पडू शकते आणि तिकडे दुर्लक्ष होते हे चीन-तैवानच्या उदाहरणांवरून स्पष्ट होते (सक्तीचे शहरीकरण, हवा-पाण्याचे प्रदूषण, धरणांमुळे भूकंप, इत्यादी), किंवा वैदयकशास्त्रातील side-effects.

कालमानानुसार 'इमारत' या रूपकाचे थिटेपण स्पष्ट होत गेले पण अजूनही मुख्य प्रवाहाची दिशा हे रूपक ठरवते. त्यानुसार सगळी सृष्टी 'शेवटी' अणु, जनुके अशा आज माहिती असलेल्या घटकांपर्यंत पोचते. पण जीवमात्रांचे गुणधर्म संपूर्णपणे समजण्यास तो अभ्यास अपुरा पडतो असे पर्यावरणवादी मत आहे. कारण अणु/जनुके हे त्यांचे ते, स्वतंत्रपणे, त्यांच्या संयोगाचे गुणधर्म ठरवत नाहीत. ते विशिष्ट पद्धतीने एकत्र येण्याने गुणधर्म विकसित होत रहातात. हा संयोग नक्की कसा होणार हे आधी सांगता येत नाही. ही प्रक्रिया सतत चालू असते व प्रक्रियेतील घटक परस्पर-सहकारी असतात. हा संयोग हे 'जाळे' या रूपकाचे स्वरूप आहे.

'इमारत' या रूपकाची दुसरी त्रुटी एक-रेषीय कार्यकारणभाव ही आहे. उदा. (तणावांसारख्या) मानासिक-शारीरिक विकारांना असा कार्यकारणभाव लागू पडत नाही. विकारामागे सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, आर्थिक कारणे असू शकतात. मध्यपूर्वेतील निर्वासितांचे मानसिक आजार पहाता त्याला कारण युद्ध आहे. वैद्यकशास्त्र अशी कारणे दूर करू शकत नाही. मग लक्षणांवर 'उपाय' होतात. इतपतच या रूपकाची मजल जाते. विटा एका पद्धतीने एकमेकीवर रचल्या की इमारत तयार; चार चाके, स्प्रिंगा एकमेकाला जोडली की घड्याळ तयार. या अचल प्रतिमानाने जिवंत सृष्टीतील गुंतागुंतीच्या प्रक्रिया समजू शकत नाहीत. सृष्टी अणूंची, जनुकांची सरळ साधी बेरीज नसते.

इमारतीचे रूपक सामाजिक संदर्भात जॉन लॉक या समाज-शास्त्रज्ञाने वापरले. त्याने व्यक्ती समाजाचा एकक (वीट) मानला. माणूस श्रेयस्कर दिशेने बदलला की समाजही श्रेयस्कर दिशेला जाईल कारण समाज म्हणजे माणसांची बेरीज. विज्ञान म्हणते त्याप्रमाणे ज्या सूक्ष्म घटकांनी सृष्टी बनली ते काहीतरी निश्चित नियम, योजना पाळतात. तशीच नैसर्गिक योजना माणसाला लागू पडते. ही योजना म्हणजे समाज. म्हणून माणसे समाजात स्थिर होतात. सरकारने (आजच्या शब्दांत राष्ट्र-राज्य) या योजनेत ढवळाढवळ करू नये. फक्त ती नीट चालत आहे एवढे पहावे कारण राष्ट्र-राज्य अस्तित्वात येण्याआधीपासून नैसर्गिक योजना अस्तित्वात होती. दीडशे वर्षांनी याच विचाराचे प्रतिध्वनी गांधींच्या विचारात आढळतात. पण माणसे एकमेकांशी, सभोवतालाशी कशी वागतात हे पहाण्यासाठी, इमारत हे रूपक अपुरे पडते.

**व्यवस्था आणि न्याय**

श्रेयस्कर व्यवस्था न्यायावर आधारित असावी. न्याय ही संकल्पना सापेक्ष व प्रसंगी संदिग्ध असली तरीही बहुसंख्य माणसांच्या अन्त:प्रेरणेनुसार असे गृहीत धरता यावे की उपासमार, शोषण, हिंसा इत्यादी अन्याय्य आहेत.

व्यवस्थेत सर्वांना जास्तीत जास्त न्याय मिळावा. 'सर्व' कोण? तर न्यायाची किमान जाणीव असणारे सगळे लोक - असे जॉन रॉल्स या तत्त्वज्ञाचे मत. व्यवस्थेतील संस्थांचा विचार महत्त्वाचा कारण त्या व्यवस्था चालवतात, न्याय देतात (किंवा नाकारतात). या संस्था कोणत्या? तर राजकीय : राष्ट्र - राज्य , त्याच्या उप-संस्था - संसद, नोकरशाही, न्याय-संस्था इत्यादी; आर्थिक : बाजार, श्रमशक्ती, इत्यादी; धर्म : श्रद्धा, उपचार, कुटुंबव्यवस्था, इत्यादि. या संस्था आदर्श व्यवस्थेत एकमेकींशी सलोख्याने वागाव्यात, मूलत: न्याय्यतेबद्दल त्यांच्यात एकमत असावे. अशी

व्यवस्था सर्वांना समान संधी देईल, प्रत्येकाची हक्क आणि कर्तव्ये स्पष्ट असतील. सामाजिक धनाचा सर्वांच्या फायद्यासाठी विनियोग होईल. ही मूल्ये संस्था समाजात रुजवतील. त्यासाठी संस्था चालवणारे सातत्याने नि:पक्षपातीपणे कार्यवाही करतील. (यातील प्रत्येक निकषावर वर्तमान संस्था अपुऱ्या पडतात हे लक्षात यावे.)

**व्यवस्था व इतिहास**

व्यवस्था इतिहासाशी संलग्न असते. इतिहास म्हणजे भूतकाळाची पुनर्रचना. ही पुनर्रचना कोण करतो, कोण वाचतो (किंवा ऐकतो) यावर ती कशी होते हे ठरते. भारतीय परंपरेत इतिहास 'उच्च'वर्णीयलिखित म्हणून अनार्य हीन दाखवले गेले असा आक्षेप असतो. 'उच्च'वर्णीय विजय हे पराभूतांच्या इतिहासानुसार अत्याचार ठरतात. (अमेरिकेतील मूळ इंडियन्स). इतिहासाच्या रचनेनुसार वर्तमानातील व्यवस्थेला वैचारिक व भावनिक बैठक मिळते. भूतकाळातील विजय मान्य केले की त्यात वेळोवेळी आलेले अडथळे दूर करणे हा नवी व्यवस्था उभारण्याचा भाग होतो. त्याउलट , ते पराभव ही पिढ्यांपिढ्यांची दडपणूक मानली तर तो आदर्शवाद झुगारणे हा पर्यायी आदर्शवाद होतो. असा काळा-पांढरा इतिहास वाचणे अनुयायांना सोयीचे असते कारण संघर्ष सोपा होतो. त्यासाठी 'खरोखर' काय घडले याचे विश्लेषण जरूर नसते. मुळात 'खरोखर' काय घडले हे आज ठरवणेच अशक्य असते.

इतिहास दोन प्रकारांनी पाहिला जातो. पहिली, रूढ, कमी बौद्धिक कष्टाची आणि आश्वासक पद्धत म्हणजे इतिहासामागे काहीतरी संगती आहे. त्या संगतीने ऐतिहासिक व्यवस्था निर्माण केली. दुसरी दृष्टी म्हणजे अनेक असंगत प्रसंग एकामागून एक घडले. तो भूतकाळ. 'हे घडले' इतपत फारतर म्हणता येईल, 'हे असे किंवा अशामुळे घडले' असे ठासून म्हणता येणार नाही. लढाई झाली हे निर्विवाद असले तरी ती का झाली हे विवाद्य असू शकते. घटनेच्या 'मागे' पाहण्यात अर्थ नाही कारण 'मागे', 'खोलात' काही नसतेच!

पहिला दृष्टिकोन बहुतेक प्रस्थापित धर्मांचा (व -वादांचा) : एका आधिभौतिक योजनेनुसार जगात घटना घडत आलेल्या आहेत, घडत आहेत व घडत रहातील - हा धर्माचा धागा असतो. हेगेल, मार्क्स यांनीही हाच दृष्टिकोन त्यांच्या (निधर्मी) प्रतिपादनात मानला.

दुसऱ्या दृष्टिकोनाच्या जवळ दोन प्रमुख विचारधारा जातात. एक बौद्ध. भूतकाळाची जाणीव एका मर्यादेपर्यंत बुद्धाला मान्य आहे. त्यापलीकडे फक्त तर्क-वितर्क होतात, त्यांना ज्ञान म्हणता येणार नाही. दुसरी विचारधारा म्हणजे अर्वाचीन उत्तराधुनिकता. कोणताही सामाजिक प्रश्न त्या स्थल-कालाची निर्मिती असतो आणि तो त्या संदर्भातच समजून घेतला जाऊ शकतो. ही भूमिका इतिहासाचा सुसंगत अन्वय नाकारते.

म्हणजे, एका बाजूला ज्याला जो रुचतो, पटतो तो इतिहास आणि त्यावर आधारित भविष्यातील व्यवस्था. दुसऱ्या बाजूला इतिहास म्हणजे वैयक्तिक पूर्वग्रहातून केलेले भूतकाळाचे वाचन. पण केवळ वैयक्तिक अन्त:प्रेरणेवर पर्यायी व्यवस्था उभी राहू शकत नाही. जितकी प्रतिभावान माणसे (म्हणजे सगळेच) तितक्या त्यांच्या श्रेय व्यवस्थेच्या भिन्न कल्पना!

**व्यवस्था आणि सत्ता**

काही जणांनी इतरांच्या इच्छेपुढे मान तुकवणे वर्तमान समाजात अटळ आहे. सत्तेखेरीज समाज चालू शकत नाही. सत्ता समाजाला हानिकारक असू शकते व हितकारकही. तत्त्वत: लोकशाहीत प्रत्येकाला मतस्वातंत्र्य असल्याने समाजात निराळी मते असणाऱ्या लोकांच्यात संघर्ष अपरिहार्य असतो. तो सोडवण्यासाठी, किमान काबूत ठेवण्यासाठी, सत्ता जरुरी असते. जॉन गालब्रेथ हा विचारवंत सत्तेचे तीन प्रकार सांगतो. सक्ती वापरणारी सत्ता शिक्षेची भीती दाखवून लोकांना आपले धोरण मान्य करायला लावते. उदा. सौदी अरेबिया, उत्तर कोरियासारख्या हुकूमशाही. किंवा इस्लामिक स्टेटचे इराक-सिरीयामधील राज्य (लेख लिहिण्याच्या वेळचे - सप्टेंबर). ते आपली मूल्ये इतरांच्या गळी मारण्याचा प्रयत्न करतात. त्यांना इतरधर्मीय श्रद्धा, सुन्नीखेरीज भिन्नपंथीय मुस्लीम श्रद्धा अमान्य आहेत आणि त्यांची खास सुन्नी श्रद्धा न मानल्यास मृत्युदंड आहे. ही सत्ता इतरांचे शोषण करते. दुसऱ्या प्रकारची सत्ता वाटाघाटी करते. आमचे धोरण तुम्ही मान्य केल्यास ही बक्षीसी मिळेल असे गाजर दाखवते व लोकांना आपल्या बाजूला वळवते. उदा, निवडणुकीदरम्यान विशिष्ट समूहांना दिली जाणारी आश्वासने. तिसऱ्या प्रकारची सत्ता मनोपरिवर्तन करू पहाते. लोकांच्या श्रद्धा, मते त्यामार्गे बदलू पहाते. उदा. काही प्रमाणात गांधीवाद व स्त्रीवाद.

याशिवाय मूल्यांच्या प्रसारासाठी नाही, तर निखळ सत्तेसाठी सत्ता मिळवण्याचा किंवा राखण्याचा प्रयत्न होतो. उदा. भारतातील आणीबाणीचे पर्व.

सत्तेचे आणखी एक रूप म्हणजे सुप्त सत्ता. सगळया औपचारिक सामाजिक संस्था विशिष्ट नियमांनी चालतात. हे नियम संस्थेच्या उद्दिष्टांसंबंधी निर्णय घेणे सोपे करण्यासाठी असतात. या नियमांत सत्ता अनुस्यूत असते. विशेषत: राजकीय संस्थांत. 'जाळे' हे रूपक येथे महत्त्वाचे ठरते. विविध चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मते सामाजिक जाळ्याचा सभासद असणे हे व्यक्तीच्या सक्षमीकरणाचे सर्वात परिणामकारक साधन आहे. इतरांवर सत्ता गाजवणे सामाजिक उतरंडीमुळे शक्य होते. सक्षमीकरण तिच्या विरुद्ध असते. महाराष्ट्रातील विदर्भात मेंढा-लेखा गावात गांधी-विनोबा यांच्या विचारावर आधारित

ग्रामदानाचा यशस्वी प्रयोग चालू आहे. तिथल्या ग्रामसभेत बहुमताने नव्हे तर सर्वसहमतीने निर्णय घेतले जातात. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाबरोबर उतरंड असणारी सत्ता विसर्जित करणे तेथे शक्य झाले आहे, या प्रयोगाच्या मर्यादा मान्य करूनही सद्यस्थितीत हे शक्य होणे हा संकेत महत्त्वाचा.

एकमेकांशी संबंधित रहाणे, जाळे विणणे ('धागा धागा अखंड विणू या!') हे एकविसाव्या शतकात रूढ सत्तेला अंशत: उत्तर दिसते. त्यासाठी मोबाईल फोन, इंटरनेट यांची मदत होते.

समाजाच्या दुबळ्या स्तराला जाळे विणणे जरूरी व उपयोगी असते, त्या अनुषंगाने सत्ताधीशांचे 'आपले' जाळे विणण्याची हातोटीही पहाण्यासारखी आहे. 'काँग्रेस तो अपनी दुकान है' असे मुकेश अंबानी म्हणत असत. भारतातून पळ काढण्याआधीपर्यंत विजय मल्ल्या - मीडिया साटेलोटे होते कारण मीडियाला ते उपकृत करत होते. कपिल शर्माकडे क्रिकेट मंडळाने लाच मागणे, त्याने तसे पत्र पंतप्रधानांना लिहिणे - हे प्रकरण ट्विटरमार्फत लगेच त्याच्या लाखो चाहत्यांपर्यंत पोचते आणि मुख्यमंत्री दखल घेतात. आज सोशल मीडिया, टी व्ही अशी नवीन सत्ता-केंद्रे निर्माण करतात.

**अर्थ-संस्था आणि जागतिकीकरण**

या विषयावर सतत चर्चा चालू असते त्यामुळे फक्त ठळक मुद्दे व आकडेवारी पाहू.

World Trade Organisation [WTO], World Bank (WB) आणि International Monetary Fund (IMF) या तीन संस्था जागतिक अर्थव्यवहार नियंत्रित करतात. त्यांच्या स्थापनेच्या वेळचे उद्दिष्ट होते - जागतिक व्यापाराने सर्वत्र भरभराट होईल व ती समाजाच्या खालच्या थरांपर्यंत झिरपेल, जेणेकरून जागतिक गरीबी दूर होईल. तसे झाले नाही. का, कसे यात जाणे लेखमर्यादेत शक्य नाही.

पण काही मुद्दे असे -

भांडवल आज जागतिक झाले आहे पण श्रमशक्ती, जी खरी माणसे पुरवते, ती स्थानिक आहे. त्यामुळे भांडवल व श्रमशक्ती वेगळ्याच अवकाशात व काळात वावरतात. भांडवल श्रमशक्ती ठरवते पण श्रमशक्ती स्थानिक परिस्थितीवर अवलंबून रहाते. औद्योगिक क्षेत्रात आज कल बहुधा कंत्राटी कामगार घेण्याचा असतो. त्यामुळे नोकरदार कामगारांची सामूहिक अस्मिता दुबळी होते व युनियन्सही दुबळ्या होतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाने आज जगाच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकाला पैसा क्षणार्धात पोचू शकतो. उत्पादन, वितरण, सेवा-क्षेत्र याच्याशी असलेले पैशाचे पारंपारिक नाते वित्त-मूल्यांच्या इलेक्ट्रॉनिक व्यापारात तुटलेले आहे, (futures, options, bonds इत्यादी अनेक). त्याचबरोबर या इलेक्ट्रॉनिक पैशाचे नैतिकतेशी नातेही तुटलेले आहे. पैशासाठी पैसा, पैशातून पैसा एवढेच या व्यापाराचे ध्येय आहे. वर्षाला केवळ चलनातील चढ-उतार अशा एका प्रकारच्या मूल्याचा व्यापार हजार-बाराशे trillion डॉलर्स असतो, आणि अशा अनेक मूल्यांचा बाजारात व्यापार होतो. (या व्यवहारातील फायदा, म्हणजे वरकड रक्कम, क्वचितच 'खालच्या' थरापर्यंत पोचते. ती वरच्या स्तरातच फिरत राहते.) जगाचा वार्षिक पारंपारिक व्यापार (उत्पादन, सेवा) २५-३० trillion डॉलर्स तर जगाची वार्षिक मिळकत ८० ते ९० trillion डॉलर्स आहे. म्हणजे वित्त-मूल्यांच्या व्यापाराचे प्रमाण वास्तवाशी नाते असणाऱ्या व्यापाराच्या शेकडो पट आहे. बँकेत कॉम्पुटरवर बसलेला माणूस हे लक्षावधी डॉलर्सचे व्यवहार एका क्षणात करतो. तो प्रामाणिक असला तरी केवळ मानवी चुकीने त्या क्षणात ती बँक, इतर बँका, प्रसंगी एखादा देशही दिवाळखोर होऊ शकतो. अशा घटना घडलेल्या आहेत, घडतही रहातील. त्यात तो खोडसाळ असला तर हे आर्थिक संकट नक्कीच ओढवते. हेही झालेले आहे. त्यात शेवटी खरा तोटा सामान्य माणसाचा होतो.

या व्यवहारांवर राष्ट्र-राज्याचे फारसे नियंत्रण नाही, त्यातील अतिक्लिष्ट व्यवहारांवर ज्यांचे नियंत्रण अपेक्षित आहे ते नोकरशहा, सामान्य माणूस, अगदी ज्यांचा पैसा गुंतलेला आहे ते कॉर्पोरेट क्षेत्रही याबाबत बरेचसे अनभिज्ञ असतात.

अशा अनियंत्रित कारभारामुळे १९९४ ला मेक्सिको, १९९७ ला थायलंड, मग द. कोरिया, इंडोनेशिया या विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था धोक्यात आल्या. नंतर २००८-९ साली अमेरिकेत मोठ्या अर्थसंस्था बुडाल्या. शेवटी सरकारला तिजोरीतील करदात्याचा पैसा भरून अर्थ-व्यवस्था सांभाळावी लागली. असे प्रसंग वारंवार येणार. तो सद्यस्थितीचा भाग आहे.

गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी पहाता मिळकतीप्रमाणे वरच्या २० % लोकांकडे पृथ्वीची ८५% मालमत्ता आहे तर ज्यांची मिळकत अगदी कमी अशा ८०% लोकांकडे फक्त दीड टक्का मालमत्ता आहे. - जगाच्या साडे-चार अब्ज प्रौढ लोकांपैकी ४५ लाख लोकांकडे (एक-सहस्रांश) - जगाची २०% मालमत्ता आहे. पण वरच्या एक सहस्रांश लोकांकडे अवाढव्य मालमत्ता असली तरी कोणत्याही समाजात वरचे १०% लोक समाजाची दिशा ठरवतात. सत्ता त्यांच्याकडे असते.

स्वत: न मिळवलेल्या आनुवंशिक संपत्तीतून विषमता येते. पिकेटी या अर्थतज्ज्ञाच्या अंदाजानुसार एकविसाव्या शतकातील मालमत्तेतील एक-तृतीयांशाहून जास्त मालमत्ता आनुवंशिक असेल. २००१ ते २०२०पर्यंत जन्माला आलेल्या पिढीतील १५ टक्के मुलांना वारशाने मिळणारी संपत्ती समाजाच्या तळातील ५०

टक्केंच्या आयुष्यभराच्या कमाईपेक्षा जास्त असेल. ही विषमता ऐतिहासिक आहे पण तिची तीव्रता एकविसाव्या शतकात वाढेल. खाजगी मालमत्तेवर बंदी हा उपाय आहे पण यासाठीची वैयक्तिक, राजकीय तयारी नाही व नसेलही.

**राज्य-संस्था**

लोकशाही श्रेयस्कर राज्यव्यवस्था मानली जाते. काही जगन्मान्य संशोधन संस्थांच्या पाहणीनुसार जगातील लोकशाहीचे चित्र आशादायक नाही. The Economist Intelligence Unit (EIU) चार प्रकारात देशांची लोकशाही प्रतवारी ठरवते. संपूर्ण लोकशाही, दुबळी लोकशाही, अधिकारशाही - व - लोकशाही आणि अधिकारशाही. संपूर्ण लोकशाहीत राजकीय व नागरी स्वातंत्र्ये मान्य असतात; सरकार, उद्योग, प्रसारमाध्यमे, नागरिक यांच्यावरील नियंत्रणाचे नियम निश्चित असतात; न्यायसंस्था स्वतंत्र असते व तिचे निर्णय बंधनकारक असतात. या तुलनेत इतर तीन व्यवस्था - दुबळी लोकशाही वगैरे - कोणत्या तरी निकषांवर कमी पडतात. EIU च्या २०१५ च्या अहवालानुसार जगातील १६७ देशातील फक्त २० देशांत संपूर्ण 'लोकशाही' आहे. त्यातील लोकसंख्या एकूण जगाच्या केवळ ९ टक्के आहे. जगातील अर्ध्याहून जास्त लोक लोकशाहीला वंचित आहेत. विशेष म्हणजे, चार देश २०१४ ला संपूर्ण लोकशाही होते, ते २०१५ ला दुबळी लोकशाही झाले.

Freedom House, BTI या इतर संशोधन-संस्थांचे निर्णयही याच्याशी मिळते-जुळते आहेत.

**सद्यस्थितीला पर्याय**

सद्यस्थितीला विरोध जगभर सतत होत असतो. एकेका आदर्शवादाची लाट येते आणि आता या आदर्शवादाचा पाठपुरावा केल्यास सद्यस्थिती बदलेल अशी आशा निर्माण होते.

मध्य-पूर्वेतील अरब वसंतात (ट्युनिशिया, लिबिया, इजिप्त, वगैरे देशात) हुकूमशाहीविरुद्ध उठाव झाले. त्याच सुमारास Occupy Movement ने जागतिक अर्थकारणाविरुद्ध निषेध सुरु केले. अल्पावधीसाठी दोन्हींनी सद्यस्थितीला पर्याय मांडण्याचे प्रयत्न केले पण शासकीय दमनाने व अंतर्गत मतभेदांमुळे ते संपुष्टात आले. निराळ्या भू-प्रदेशात या चळवळी जन्माला आल्या तरी प्रस्थापित व्यवस्था बहुसंख्यांना न्याय देऊ शकत नाही ही त्यांची समान धारणा होती. आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, वगैरे मिळून सत्ताधीश एकूण लोकसंख्येच्या १ टक्काही नसतात म्हणून Occupy Movement ची घोषणा होती we are the 99%.

या चळवळी लोकांनी सुरू केल्या. त्या खालून वर आल्या. अशी आंदोलने जगभर विशिष्ट प्रश्नांवर होत आहेत. उदा. मुख्य प्रवाहाच्या विशिष्ट प्रकल्पाला आव्हान - धरणे, industrial corridor, अणुप्रकल्प वगैरे. अशी आव्हाने कार्यकर्त्यांसाठी जीवघेणी ठरू शकतात. मागील वर्षी Berta Caceres (कासेरेस) या होन्डुरास देशातील (द. अमेरिका खंड) आंतरराष्ट्रीय मान्यवर कार्यकर्तीचा खून झाला. त्या मानवी हक्कांच्या व पर्यावरणाच्या रक्षणासाठी झगडत होत्या. होन्डुरासमध्येच २०१४ साली १२ पर्यावरणवादी कार्यकर्त्यांची हत्या झाली. सद्यस्थितीला विरोध तीस्ता सेटलवाडच्या छळापासून अशा हत्येपर्यंत जाऊ शकतो. त्यामागे राष्ट्र-राज्य, दुखावलेले व्यापारी हितसंबंध असतात. अशी आंदोलने जरी पर्यायी सम्यक् व्यवस्था देऊ शकत नाहीत, तरी आजमितीला त्यांची निकड आहे. अन्यथा व्यवस्थेच्या बळींना आवाज नाही.

पर्यायी व्यवस्था म्हणून विचार करता मार्क्स आणि गांधी यांनी पर्याय मांडले. मार्क्सवाद चीनने,रशियाने, पूर्व युरोपाने अनधिकृतरीत्या/अधिकृतरीत्या केव्हाच सोडला. तो आज राष्ट्र-राज्यविरोधी गनिमी हिंसक उठावांची स्फूर्ती मात्र मानला जातो. पण उठाव हा काही व्यवस्था म्हणून पर्याय नाही. तीच गोष्ट निष्प्रभ डाव्या पक्षांची. सध्या तर युरोप-अमेरिकेत उजव्या शक्ती प्रबळ होत आहेत. गांधींच्या विचाराने विविध उपक्रमांना स्फूर्ती दिली पण व्यवस्था म्हणून तो पर्याय उभा राहिला नाही. स्थानिक विधायक उपक्रम हे त्याचे आजचे मर्यादित रूप दिसते. (किंबहुना गांधींना 'व्यवस्था' अशी अभिप्रेतच नसावी, पण तो मुद्दा निराळा.)

आज स्वयंसेवी संघटना व काही प्रमाणात पर्यावरणवाद व स्त्रीवाद हे पर्याय धरले जातात. ते खाली पाहू.


**स्वयंसेवी संघटना**

पर्यावरणवादी व बहुतेक स्वयंसेवी संघटनांच्या विचारानुसार वर म्हटलेल्या WTO, WB आणि IMF या अर्थसंस्था तिसऱ्या जगाला अधिकाधिक कर्जात ढकलतात. (कर्ज फेडण्यासाठी कर्ज). त्यांच्या धोरणांनी सामाजिक असंतोष व पर्यावरणीय हानी वाढत आहे. म्हणून त्यांच्याबरोबर संयुक्त राष्ट्र-संघाचीही पुनर्रचना व्हावी अशा प्रयत्नात या संघटना ९९ सालापासून आहेत.

स्वयंसेवी संघटना सद्यस्थिती मूलत: फारशी न बदलता त्यातील बळींची विशिष्ट गरज तत्कालीन किंवा दीर्घकालीन कार्यक्रमांनी भागवतात. उदा. रेड क्रॉस युद्ध-काळात तेथे धावून जाईल, युद्ध कशामुळे हा प्रश्न विचारणार नाही. दुसरी संघटना अपंगाना कृत्रिम अवयव देईल, तिसरी पोरकी कुत्री दत्तक घेईल, वगैरे. म्हणजे, तात्पुरत्या मलमपट्टीपुढे ते व्यवस्थेला पर्याय देत नाहीत. किंबहुना त्या व्यवस्था बळकटच करतात. त्यांच्याकडे असणारा पैसा, जगभरची कार्यालये व माहिती-तंत्रज्ञान अवगत असणारी पगारी कार्यकर्त्यांची प्रचंड संख्या यामुळे त्या जागतिक सत्ता झाल्या आहेत आणि हे राष्ट्र-राज्याला खुपते. त्यांना परदेशातून

मिळणारा पैसा हे कायमच विवाद्य प्रकरण आहे. रशिया, भारतासारखे देश त्याविरुद्ध कारवाईही करतात.

या संघटना 'वरून खाली' येतात. त्यांच्या कार्यक्षेत्रातील माणसाला काय हवे ते त्या ठरवतात, तो माणूस नाही. तो माणूसही तळातला खरा गरजू असेलच असेही नाही. त्या काय काम करतात हे त्यांच्या आदर्शवादावर अवलंबून असते. आणि तो आदर्शवाद स्थानिक आदर्शवादाच्या संघर्षात येणार नाही याबाबत त्या सावध असतात. उदा. भारतातील जाती-व्यवस्थेच्या उच्चाटनाची, स्थानिक सत्ता-समीकरणे बदलण्याची अपेक्षा त्यांच्याकडून ठेवता येत नाही. आणि नेमक्या याच गोष्टी तळातल्या स्तराच्या खऱ्या सक्षमीकरणासाठी त्या ठिकाणी आवश्यक असू शकतात.




**पर्यावरणवाद**

परस्परावलंबित्व समाजजीवनाला आवश्यक आहे हे प्रथम धर्माने ओळखले. त्यावेळचे निसर्गावलंबित्व त्याला कारणीभूत असू शकते. तोच विचार विज्ञानाच्या सहाय्याने पर्यावरणवादी मांडतात.

त्यांच्या पर्यायी व्यवस्थेत कोणताही प्रकल्प छोटा व पर्यावरण-स्नेही हवा, कमीत कमी उर्जा वापरणारा, प्रदूषण न करणारा, मालाचा पुनर्वापर करणारा हवा, शेतीत कृत्रिम रसायने नकोत, नगर-रचना अशी असावी की खाजगी वाहनांचा वापर कमी होईल, वगैरे. भांडवलशाहीचे प्रमुख इंजिन म्हणजे कॉर्पोरेट जगत. त्याच्या सततच्या अनिर्बंधित वाढ आणि नफा या हव्यासावर आळा घालायचा असेल तर या जगताची पुनर्रचना झाली पाहिजे. (गांधी-विश्वस्त).

आता एक नवीन शास्त्र विकसित होत आहे. त्याला निसर्गानुकरणी तंत्रज्ञान म्हणतात. वनस्पती, जीवमात्र लाखो वर्षांच्या उत्क्रांतीने आजच्या अवस्थेला पोचले आहेत. ही उत्क्रांती पर्यावरणाशी जुळवून घेत झाली. उदा. कमळांची पाने आपलीआप सफाई करतात. तशा प्रकारच्या अतिशय पातळ थराचा वापर इमारतींवरच्या रंगासारख्या वेष्टनासाठी होऊ शकतो. तसे वेष्टन जर्मन शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे. उद्याच्या इलेक्ट्रिक मोटारींसाठी असेच अत्यंत तलम आवरण अमेरिकेत एका विद्यापीठाने विकसित केले आहे. ही उद्याची तंत्रज्ञाने निसर्गातील वनस्पती, समुद्रातले विशिष्ट प्रकारचे शिंपले, अशा प्रारूपांवरील संशोधनावर विकसित होत आहेत.

प्रयोग म्हणून हे ठीक आहे. पण उद्या ते बाजारात विकाऊ तंत्रज्ञान म्हणून येणार. तेव्हा व्यापारी वृत्तीने त्याची किंमत, उपलब्धता, विक्री तिसऱ्या जगातील खालच्या स्तराला डोळ्यासमोर ठेवून केली जाईल का, याची शंका वाटते. तो व्यापार परत कॉर्पोरेट होऊ शकतो. (तिसऱ्या जगातील बहुसंख्यांसाठी मोटार-गाडीच्या आवरणासारखे संशोधनच अप्रस्तुत आहे. ते पश्चिमेचे प्राधान्यक्रम दर्शवते.)

तळातल्या स्तराचा भारतापुरता विचार करता, त्यांची जगण्याची संसाधने काय; त्यावर उच्चजातीयांचे, धनदांडग्यांचे, सरकारचे नियंत्रण किती व ते कमी करता येईल का; तेथे भिन्न जातीच्या लोकांना, स्त्रियांना, दुबळ्या थराला समानतेची वागणूक दिली जाईल का; मुलींना शिक्षणाची संधी किती; त्यांचे लग्न लवकर करणे हे उद्दिष्ट राहील का; नैसर्गिक शेती बाजारात टिकू शकेल का असे अनेक घटक न्याय्य व्यवस्था निर्माण करण्यासाठी लक्षात घ्यावे लागतील. परत, ही मागणी तळातून आली पाहिजे, तरच तो बदल टिकाऊ होईल. पर्यावरणाच्या रक्षणाच्या 'वरून येणाऱ्या' आग्रहाने पर्याय निर्माण होणार नाही.

**स्त्रीवाद व उपभोक्तावाद**

या संदर्भात वाढत्या उपभोक्तावादाची प्रागैतिहासिक पार्श्वभूमी पाहणे उपयोगी ठरेल. गिलमोर या पुरातत्त्वशास्त्रज्ञाच्या अभ्यासानुसार 'खऱ्या' पुरुषाची व्याख्या विविध प्राचीन संस्कृतीत सारखीच आढळते. पुनरुत्पादनक्षमता स्त्रीत्व सिद्ध करते, म्हणजे स्त्रीत्व स्वयंसिद्ध असते. तसे पुरुषाचे नाही. पौरुष हे मूल्य केवळ शारीरिक नसते. ते 'मिळवावे' लागते. शारीरिक बळ, आक्रमकता या सर्वश्रुत पुरुषी गुणधर्मांबरोबर एक महत्त्वाचा गुणधर्म प्राचीन संस्कृतीत खरा 'पुरुष' कोण ते ठरवत असे. हा गुणधर्म म्हणजे

पुरुषाने त्याच्या उपभोगापेक्षा जास्त उत्पादन करायला हवे. म्हणजे तो एक किलो भात खात असेल तर त्याने एक किलोहून जास्त भात पिकवला पाहिजे. हे जास्तीचे उत्पादन समाजासाठी असे. 'खरा' पुरुष उदार असतो (कर्ण). कालौघानुसार या अपेक्षेत बदल झाला - समाजासाठी उत्पादन करण्याऐवजी स्वत:साठीच अधिकाधिक भौतिक गोष्टी गोळा करणारा तो खरा पुरुष अशी व्याख्या रूढ होऊ लागली. मग ज्याच्याकडे जास्त जमीन, जास्त गुरे, तो 'मोठा' झाला. यस्यास्ति वित्तं स नर: कुलीन:... यथावकाश सगळेच गुण संपत्तीला चिकटले. Jean Baudrillard या फ्रेंच तत्त्वज्ञाच्या मते पैशाने खरेदी केलेले माझे कपडे, घर, गाडी (ही प्रतीके) माझे समाजातील स्थान ठरवते. किमान गरजांसाठी काय आवश्यक याचा विसर पडला आहे. माणसेच प्रतीक-मूल्ये झाली आहेत. हे रूपक आज पुरुषप्रधानतेचा भाग आहे. स्त्री-पुरुषसंबंधांची सत्ता-विरहित पुनर्व्याख्या करून स्त्रीवाद या अर्थाने उपभोक्तावादाला आव्हान देऊ शकतो.

थोडक्यात, पर्यावरणवादी सृष्टी जपण्याचा आग्रह करतात तर स्त्रीवादी समाजाचा दृष्टिकोन न्याय्य करण्याचा प्रयत्न करतात. (दोन्ही विचार 'जाळे' हे रूपक गृहित धरतात.) सद्यस्थितीतील हे दोन विचार परस्परपूरक झाले तर निदान तत्त्विक पर्याय तरी उभा रहातो.

त्याचा तपशील, त्यातील अंतर्विरोध हा निराळ्या अभ्यासाचा विषय आहे.

**निरीक्षण**

राष्ट्र-राज्याचे प्रभुत्व जागतिकीकरणाच्या रेट्याखाली कमी होत आहे. लेखाच्या सुरुवातीला आदर्श व्यवस्थेतील प्रमुख संस्था एकमेकींशी सलोख्याने वागाव्यात असे म्हटले आहे. त्या संदर्भात आज दर दोन संस्थात संघर्ष दिसतो. उदा. धर्म व स्त्री-संघटना (शनी शिंगणापूर); राष्ट्र-राज्य व अर्थसंस्था (पश्चिमेतील संस्थात्मक भ्रष्टाचार करणाऱ्या बँका व सरकार), इत्यादी. कारण न्याय्य काय यात एकमत नाही. त्याचबरोबर धोरणांची कार्यवाही नि:पक्षपातीपणे होत नाही. राष्ट्र-राज्याचे दुबळेपण आणि हे तडे ही पर्यायाला संधी आहे. माहितीच्या देवघेवीची वाढलेली शक्यताही जाळे विणण्यासाठी उपयोगी आहे. स्वयंसेवी संघटना ते करतात.

आता पर्यायी व्यवस्था प्रत्यक्षात आणण्याच्या मार्गातील अडथळे पाहू.

लेखात आजच्या ज्वलंत मध्य-पूर्वेचा उल्लेख मात्र आहे. तेथे होती ती व्यवस्था दिवसागणिक बेचिराख होते आहे, लाखो मारले गेले आहेत, हत्याकांड चालू आहे आणि लाखो निर्वासित होत आहेत. ही विराट मानवी वेदना आहे. अशा वेदनांबाबत उर्वरित जग अक्षम्यरीत्या उदासीन असते. सद्यस्थितीला पर्याय शोधण्यातला बहुसंख्यांची उदासीनता हा पहिला अडसर आहे.

दुसरा अडसर - जोपर्यंत खाजगी मालमत्ता जात नाही, तोपर्यंत सद्यस्थितीला टिकाऊ पर्याय येत नाही.

तीन - राष्ट्र-राज्य. ते जागतिकीकरणाने बाह्यत: दुबळे होत आहे तर अंतर्गत धोरणात अधिक दमनकारी.

चार - प्रस्थापित, 'उजवे' त्यांच्या कार्यक्रमाबाबत जितके जागरूक व स्पष्ट असतात, तितके 'पर्यायी', डावे, मुक्तविचारी स्पष्ट नसतात. त्यांची वैचारिक संदिग्धता, अंतर्गत विभाजन एकसंध पर्याय देऊ शकत नाही.

त्यामुळे सद्यस्थिती, मानवी वृत्ती व दिशा पहाता सर्वसमावेशक व वास्तवात येऊ शकेल अशी पर्यायी व्यवस्था येणे कठीण दिसते. कदाचित जागतिक दर्जाच्या भव्य भौतिक पर्यायी आदर्शवादाचा काळ संपला असावा. ती वैचारिक पोकळी प्रत्यक्ष व्यवहारात जागतिकीकरणाने भरली असावी.

मर्यादित भूभागात समाजाच्या खालच्या थराचे जीवन पर्यावरण-स्नेही, समताधिष्ठित करणे इतपतच पर्यायी व्यवस्था आज शक्य दिसते. ती विस्तारावी.

*चन्द्रशेखर पुरन्दरे, इंग्लंड*
*www.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.com*

**संदर्भ**

(बहुतेक इंटरनेटवरून, काही प्रमुख खालीलप्रमाणे)

आंदोलन : ऑक्टोबर २०१३ : मेंढा लेखाचे ग्रामदान - पराग चोळकर

A Theory of Justice - John Rawls

Capital in the Twenty-First Century - Thomas Picketty

Democracy in Retreat - Joshua Karlantizick

International New York Times, The Economist, The Guardian वगैरे वृत्तपत्रे

The Economist Intelligence Unit - Democracy Index 2015

The Politics of Climate Change - A Giddens

The Systems View of Life - Fritjof Capra and Pier Luigi Luisi

विशेष आभार : मोहन हिराबाई हिरालाल

❐